## संपादकीय


# अर्थव्यवस्थेत आपण...

आपण गेले काही दिवसापासून वर्तमानपत्रात वाचत आहोत की, ही कंपनी बंद पडली, एवढे कामगार बेरोजगार झाले, ॲटोमोबाईल इंडस्ट्री तोट्यात आहे. वाहन खरेदी कमी झाली आहे या आणि अशा प्रकारच्या बातम्या आपण वाचत आहोत, अनुभवत आहोत. आपला देश मंदीच्या दिशेने वाटचाल करतो आहे का? हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात घर करून राहिला आहे आणि हे सत्यही आहे. जगात सर्वात मोठी लोकसंख्या असलेला आणि लवकरच महासत्ता होवू पाहात असलेल्या आपल्या भारताला या समस्येकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

देशात आणि देशातील बहुतांश राज्यात असलेल्या सरकारचेही याकडे लक्ष आहेच. रियल इस्टेट, ॲटोमोबाईल या दोन क्षेत्रांत तर काळजी करावे असे वातावरण तयार झाले आहे. काही शहरे तर ॲटोमोबाईल इंडस्ट्रीवर तग धरून आहेत. म्हणजे असे की, एक-दोन मोठ्या कंपन्या ज्या शहरात आहेत अशा प्रत्येक शहरात या कंपन्यावर अवलंबून असणारे अनेक छोटे-मोठे उद्योग कार्यरत आहेत. या कंपन्यांच्या आर्थिक अडचणीमुळे सर्व औद्योगिक क्षेत्र प्रभावित होत आहे व अजूनही मोठ्या प्रमाणात याचा प्रभाव पडून अनेक रोजगार, व्यापार बंद पडतील की, काय अशी शक्यता निर्माण झाली आहे. या परिस्थितीतून मार्ग काढण्याची जबाबदारी निश्चित सरकारची आहेच, त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. परंतु आपणही आपल्या वैयक्तिक पातळीवर या परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रयत्न करू शकतो. कारण ही परिस्थिती फार काळ राहणार नाही. फार तर एखादे वर्ष आपल्याला त्रास होवू शकतो. आपण आपले खर्च कमी करणे, लक्झरी वस्तू व राहणीमानावर होणारा खर्च टाळणे, आपण केलेली गुंतवणूक बुडेल म्हणून या काळात काढून घेणे टाळावे. कारण ही परिस्थिती सुधारल्यावर आपले जीवन पूर्ववत होईल याबाबत आपण सकारात्मक दृष्टीने विचार करावा एवढेच.

**-सुभाष सबनीस**

# अशी करा गणपतीची प्राणप्रतिष्ठा



**गणपती स्थापना तथा पूजन क्रम**

हातपाय धुवून स्वच्छ सोवळे नेसून महागणपतीच्या पूजनाला बसावे. गणपतीची मूर्ती व पूजा साहित्य घ्यावे.

१) पळी, भांडे, ताम्हण, कलश.
२) उदबत्ती, नीरांजन, पंचामृत.
३) हळद, कुंकू, अक्षता, गंध.
४) विड्याची पाने, फळे, सुपाऱ्या.
५) नारळ.
६) खिरापत, मोदकाचा नैवेद्य.

**उदकोपस्पर्श** (डोळ्यांना पाणी लावावे)

अपवित्रः पवित्रोवा सर्वावस्थांगतोपिवा।
यः स्मरेत् पुंडरिकाक्षं सवाह्यास्पंतरः शुचि।।
सर्वं शुचिः

**ललाटे तिलक करणं** (स्वतःचा कपाळी गंध लवावे)

स्वस्ति स्तुया विनाशाख्या पुण्य कल्याण वृद्धिदा।
विनायकः प्रियानित्यं तां च स्वस्तिं बृवन्तुनः।।

**आचम्य** (तीन वेळा पळीने उजव्या हातात पाणी घेऊन पिणे. एक वेळा ताम्हणात सोडणे व नंतर नमस्कार करणे.)

ॐ केशवाय नमः । नारायणाय नमः । माधवाय नमः । गोविंदाय नमः । विष्णवे नमः । मधुसुदनाय नमः । त्रिविक्रमाय नमः । वामनाय नमः । श्रीधराय नमः । ऋषिकेषाय नमः । पद्मनाथाय नमः । दामोदराय नमः । संकर्षणाय नमः । वासुदेवाय नमः । प्रद्युम्नाय नमः । अनिरुद्धाय नमः । पुरुषोत्तमाय नमः । अधोक्षजाय नमः । नारसिंहाय नमः ।अच्युताय नमः । जनार्दनाय नमः । उपेन्द्राय नमः । हरये नमः । श्रीकृष्ण परमात्मने नमः ।

**प्राणायाम** (प्राणायाम करावा)

प्रवस्य परब्रह्म ऋषिः। परमात्मा देवता । देवी गायत्री च्छंदः। प्राणायामे विनियोगः।
आपोज्योतीं रसोमृतं ब्रह्मभूर्भुवः स्वरोयम।

**देवताध्यान** (हातात अक्षत घेऊन देवतांचे ध्यान करावे.)

श्री मन्महागणाधिपतये नमः । लक्ष्मीनारायणभ्यां नमः। उमामहेश्वराभ्यां नमः । वानी हिरव्यगर्भाथ्यां नमः । शचीपुरन्दराभ्यां नमः । माता पितृचरण कलमेभ्यो नमः । ग्रामदेवताभ्यो नमः । स्थानदेवताभ्यो नमः। वास्तुदेवताभ्यो नमः । सर्वेभ्यो देवभ्यो नमो नमः। सर्वोभ्यो ब्राह्मणेभ्यो नमो नमः । स्तिद्धि बुद्धि संहिताय श्री महागणाधिपतये नमः । निर्विघ्नमस्तु ।। सुमुखश्चैकदंश्च कपिलो गणकर्णकः । लंबोदरश्च विकटो विघ्ननाशो गणाधिपः ।। द्वादशेतानि नामानि यः पठेच्छृणुयारपि।। विद्यारंथे विवाहेच प्रवेशे निर्गमे तथा । संग्रमे संकटेश्चैव विघ्नस्त य न जायते ।। सर्व मंगल मांगले शिवे सर्वार्थ साधिके । शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणि नमोस्तुते । विनायकं गुरूं भानुं ब्रह्म विष्णू महेश्वरान् । सरस्वतीं प्रणम्यादौ सर्वकार्यार्थ सिद्धये ।।

**संकल्प** (हातात पळीभर पाणी घेऊन त्यात गंधाक्षत टाकावे. सुपारी ठेवून तिथी, वार, नक्षत्र योगाचा उल्लेख करावा.)

अथवा

तिथीर्विष्णूः स्तथा वारों नक्षत्रं विष्णूरेवच ।
योगश्च करणं विष्णूं सर्वं विष्णूमयं जगत् ।।

पूर्वोच्चरित एवं ग्रह गुण गण विशेषेण विशिष्टायां शुभपुण्यतिथौ।

(आपल्या गोत्राचा व नावाचा उच्चार करावा व पुढीलप्रमाणे म्हणावे.)

मम आत्मनः श्रृति स्मृति पुराणोक्त पुण्य फल प्राप्यर्थं धर्म अर्थ काम मोन चतुर्विथ पुरुषार्थ सिद्धर्थं, श्री महागणपति देवताना अखंडित कृपा प्राप्यर्थं विधादि असय्य धन प्राप्यर्थं प्रतिवार्षिक भाद्रपद मासे पार्थिव महागणपति व्रतांतर्गत, प्राणप्रतिष्ठापूर्वक पार्थिव महागणपति स्थापन पूजनंच करिष्ये.

(असे उच्चारुन हातातील पाणी ताह्मणात सोडावे. पुन्हा पळीभर पाणी हातात घ्यावे व पुढील संकल्प म्हणून पाणी ताह्मणात सोडावे.)

तत्रादौ आसनादि शंख, घंटा, पूजनं दीपार्क पूजनंच करिष्ये.

**आसन पूजन** (स्वतःच्या आसनावर गंधाक्षत-फूल वाहावे)

पृथ्वीत्वया धृता लोकादेवीत्वं विष्णुनाधृता।
त्वंच धारय मां देवी पवित्रं कुरुचास्मन् ।।

**शंख घंटा पूजा** (शंखाला गंध-फूल वाहावे)

शंख पांचजन्याय विस्महे पवमानाय धीमही।
तन्नो शंखः प्रचोदयात ।।
शंखस्य देवाभ्यों नमः ।

**घंटा** (घंटेला गंधाक्षत-पुष्प वाहावे)

वैनतेयाय विद्महे स्वर्णवक्षाय धीमही।
तन्नो गरुडः प्रचोदयात ।
गरुडरुपायै घंटीकायैं नमः ।।

**दीप दिवाकर पूजन**

दीप (दिव्याला गंधाक्षत-पुष्प वाहावे.
(धृत दीप तैल दीप)
शुभं करोति कल्याणं आरोग्य धनसंपदा।
शत्रुबुद्धिविनाशाय दीपज्योतिर्नमोत्सुते।।
दीपस्थ देवेभ्यो नमः ।।

**सूर्य** (सूर्याला लाल फूल-अक्षत व पाणी वाहावे)

आदित्यस्य नमस्कारान ये कुर्वन्ति दिने दिने।
जन्मान्तर सहस्त्रेशु दारिद्र्यं जोपजायते ।।
आदित्याय नमः ।।

**कलश पूजन** (आपल्या डाव्या बाजूला कलश ठेवून त्याच्या चारही दिशांना गंध लावून फूल वाहावे.)

गंगेचं यमुने चैव गोदावरी सरस्वती।
नर्मदे सिंधु कावेरी जले स्मिन सन्निधिंकुरू ।
कुलशस्थ देवेभ्यो नमः ।।

**प्राणप्रतिष्ठा** (हातात पाणी घेऊन पुढील संकल्प म्हणावा.)

एवं ग्रह गुण गण विशेषेण विशिष्टायां शुभपुण्य तिथौ अस्थाः मृत्तिकामय मूर्तेषू प्राणप्रतिष्ठां करिष्ये ।
(हातातील पाणी ताह्मणात सोडावे)
(दुर्वांनी महागणपती मूर्तीला थोडे तूप लावावे)

**मूर्ती: घृतेनाभ्यज्य** (त्याच दुर्वांनी मूर्तीवर थोडे पाणी वाहावे व खालील मंत्र म्हणावा.)

प्राणदा अपानदा व्यानदा बूर्चोदा घरिवोदाः ।
अन्यांस्ते अस्मत्त पंतुहेतयः पावको । अस्मभ्य शिवोभव ।। (आपला उजवा हात मूर्तीवर ठेवावा व डावा हात स्वतःच्या छातीला लावावा, मूर्तीमध्ये प्राण प्रतिष्ठित होत आहे, अशी भावना करावी व पुढीलप्रमाणे म्हणावे.)

ॐ आं ऱ्हीं क्रों अं यं रं लं वं शं षं सं हं ळं क्षं हंसः अस्य पार्थिव महागणपती मूर्तेषू प्राणा इह प्राणाः।।
जीव इस स्थितः।।
सर्वेन्द्रियानि इहायान्तु ।।

**ध्यानम्** (हातात अक्षत घेऊन गणपतीचे ध्यान करावे)

ॐ वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटि समप्रभ ।
निर्विघ्नं कुरुमे देव सर्व कार्येषु सर्वदा ।।
(अक्षत गणपतीवर वाहावी)
महागणाधिपतये नमः ध्यानम ।।

**आवाहनम्** (हातात दुर्वाक्षता घेऊन गणपतीचे आवाहन करावे व दुर्वाक्षता गणपतीवर वाहाव्यात.)

लंबोदर नमस्तुंभ्यं सततं मोदकप्रियं ।
निर्विघ्नं कुरुमेदेव प्रसन्नो भव सर्वथा ।।
महागणधिपतये नमः आवाहनम् समर्पयामि।।

**आसनम्** (हातात दुर्वाक्षता घेऊन महागणपती ठेवण्याच्या जागेवर वाहाव्यात)

रम्पं सुशोभनं दिव्यं सर्व सौख्यकरं शुभम् ।।
आसनंच मया दलं गृहाण गणनायक ।।
महागणाधिपतये नमः आसनम् समर्पयामि ।।

**पाद्यं** (दुर्वांनी महागणपतीच्या मूर्तीवर पाणी शिंपडावे)

उष्णोदकं निर्मलंच सर्वसौगंध्य संयुतम् ।

पारडाक्षालनार्थाय दत्तं ते प्रतिगृहयताम् ।।
महागणाधिपतये नमः पाद्यं समर्पयामि।।

**अर्घ्यं** (पुन्हा दुर्वांनी मूर्तीवर पाणी शिंपडावे)
ताम्रपात्रे स्थितं तोयं गंधपुष्प फलान्वितं ।।
सहिरण्यं दबाम्यर्धं गृहाण गणनायक ।।
महागणाधिपतये नमःअर्घ्यं समर्पयामि ।।

**आचमनीयं** (दुर्वांनी मूर्तीवर पाणी शिंपडावे)
सर्वतीर्थ समायुक्तं सुगंधि निर्मलं जलम् ।
आचम्यतां मया दत्तं प्रीयंतां गणनायक ।।
ॐ महागणाधिपतये नमः आचमनीयं समर्पयामि ।।

**स्नानीयं** (शुद्ध पाणी मूर्तीवर दुर्वांनी शिंपडावे)
गंगा सरस्वती देवा पयोष्णी नर्मदा जलैः ।।
स्नापितोसि मया देव ह्यत; शांतिंजयच्छ में ।
ॐ महाणाधिपतये नमः स्नानीयं समर्पयानि ।।
पयादि पंचामृत स्नानम्

**पयः स्नानम्** (दुर्वांनी गणपतीवर थोडे दूध वाहावे)
कानधेनू समुद्रभूतं सर्वेषां जीवनं परम् ।
पावनं यज्ञहेतुश्च पयः स्नानार्थमर्पितम् ।।
ॐ महागणाधिपतये नमः पयः स्नानमं समर्पयामि ।।
(दुर्वांनी थोडे शुद्ध पाणी वाहावे)
शुद्धोदकं समर्पयामि ।।

**दधि स्नानम्** (दुर्वांनीच थोडे दही मूर्तीला लावावे)
पयसस्तु समुद्भूतं मयुराम्लं शशिप्रथं।
दध्यानीतं मयादेव स्नानार्थं प्रतिगृह्यताम् ।
ॐ महागणाधिपतये नमः दधिस्नानं समर्पयामि ।।
(दुर्वांनी थोडे शुद्ध पाणी वाहावे)
शुद्धोदकं समर्पयामि ।।

**घृतस्नानम्** (दुर्वांनी मूर्तीला तूप लावावे)
नवनीत समुत्पन्नं सर्वसंतोषकारकम् ।।
धृतं तुप्पं प्रदास्थामि स्नानार्थ प्रतिगृह्यताम ।।
ॐ महागणाधिपतये नमः घृतस्नानं समर्पयामि ।।
(दुर्वांनी शुद्ध पाणी वाहावे)
शुद्धोदकं समर्पयामि ।।

**मधुस्नानम्** (मूर्तीला दुर्वांनी थोडे मध लावावे)
तसपुष्प समुद्भूतं सुस्वादु मधुरं मधु।।
तेजः पुष्टिकरं दिव्यं स्नानार्थ प्रतिगृह्यताम् ।।
ॐ महागणाधिपतये नमः मधुस्नानं समर्पयामि ।।
(दुर्वांनी शुद्ध पाणी वाहावे)
शुद्धोदकं समर्पयामि ।।

**शर्करास्नानम्** (बोटांनी थोडी साखर महागणपतीवर वाहावी)
इतुसारमुद्भूता शर्करा पुष्टिकारिका ।
मलापहारिकां दिव्या स्नानार्थ प्रतिगृह्यताम ।।
ॐ महागणाधिपतये नमः सर्करा स्नानम् समर्पयामि।।
(दुर्वांनी शुद्ध पाणी वाहावे)
शुद्धोदकं समर्पयामि ।।

**पंचामृत स्नानम् (दुर्वांनी मूर्तीवर एकत्र पंचामृत वाहावे)**
पंचामृत मयानीतं पयो दधि घृतं मधु ।।
स्नानार्थं ते प्रयच्छमि गृहाण परमेश्वर ।।
ॐ महागणाधिपतये नमः पंचामृत स्नानं समर्पयामि।।
(दुर्वांनी शुद्ध पाणी वाहावे)
शुद्धोदकं समर्पयामि ।।

**गंधोदकं स्नानम् (दुर्वांनी गंधाचे पाणी देवावर शिंपडावे)**
मल्याचल संभूतं चंदनागरुकेशरम्।
चंदनंच मया दत्तं स्नानार्थ प्रतिगृह्यताम् ।।
ॐ महागणाधिपतये नमः गंधोदकं समर्पयामि ।।
(दुर्वांनी शुद्ध पाणी वाहावे)
शुद्धोदकं समर्पयामि ।।

**गंधाक्षतपुष्प समर्पणम्**
**(महागणपतीला अभिषेकासाठी गंधाक्षत-फूल वाहावे)**
ॐ महागणाधिपतये नमः अभिषेकार्थ गंधाक्षत पुष्पौः समर्पयामि ।

**अभिषेक**
**(दुर्वांनी गणपतीवर अथर्वशीर्ष होईपर्यंत पाणी शिंपडावे)**
ॐ नमस्ते गणपतये । (अथर्वशीर्ष)
ॐ महागणाधिपतये नमः अभिषेक स्नानं समर्पयामि.
(दुर्वांनी शुद्ध पाणी वाहावे)
शुद्धोदकं समर्पयामि ।।

**सुगंधी तैल** (दुर्वांनी गणपतीला अत्तर लावावे)
नाना सुगंधी द्रव्यंच चंदनं रजनीयुतं।
उद्वर्तनं मया दत्तं स्नानार्थं प्रतिगृह्यताम् ।।
ॐ महागणाधिपतये नमः उद्वर्तनं समर्पयामि ।।
(दुर्वांनी शुद्ध पाणी वाहावे)
शुद्धोदकं समर्पयामि ।।

**वस्त्रम्** (देवाला कापसाचे वस्त्र वाहावे)
सर्वभूषाधिके सौम्ये लोक लज्ञा निवारिणे।
मयोपपादिते तुप्पं वाससी प्रतिगृह्यताम् ।

ॐ महागणाधिपतये नमः वस्त्रं समर्पयामि ।।
(दुर्वांनी शुद्ध पाणी वाहावे)
शुद्धोदकं समर्पयामि ।।

**उपवीतम्** (देवाला जानवे वाहावे)
वथिस्तुतुभिर्यक्तं त्रिगुणं देवतामयम् ।
उपवीतं मया दत्तं गृहाण परमेश्वर।।
ॐ महागणाधिपतये नमः उपवीतम् समर्पयामि ।।
(शुद्ध पाणी ताह्मणात सोडावे)
आचमनीयं समर्पयामि ।।

**गंध समर्पणम्** (देवाला उजव्या हाताच्या करंगळी शेजारील बोटाने गंध लावावे)
श्रीखंडं चंदनं दिव्यं गंधाढ्यं सुमनोहरम् ।
विलेपनंच सुरश्रेष्ठं चंदनं प्रतिगृह्यताम् ।
ॐ महागणाधिपतये नमः चंदनं समर्पयामि ।।

**अक्षत समर्पण** (देवाला अक्षता वाहाव्यात)
अक्षताश्च सुरश्रेष्ठा कुंकुमाला सुशोभिता ।
मयानिवेदिता भक्त्या गृहाण परमेश्वर।।
ॐ महागणाधिपतये नमः अक्षतान् समर्पयामि ।।

**सौभाग्य द्रव्य समर्पण** (देवाला हळद, कुंकू, शेंदूर वाहावे)
अबीरं आयुषोवृद्धिः गुलालं प्रीतिवर्धनम् ।
सिदूरेण समासुन्तं सौभाग्यं प्रतिगृह्यताम् ।
ॐ महागणाधिपतये नमः सौभाग्य द्रव्याणि समर्पयामि।।

**दुर्वांकुर समर्पणम्** (देवाला २१ दुर्वा वाहाव्यात)
हे दुर्वे अमृत संपन्ने शतमूले शतांकुरे ।
शतंहरति पापानि शतमायुष्य वर्धिनी ।।
ॐ महागणाधिपतये नमः दुर्वांकुरान समर्पयामि ।।

**पुष्पसमर्पणम्** (देवाला विविध पुष्पे अर्पण करावीत)
माल्यादीनि सुगंधीनि माल्यादीनि वैप्रभो ।
मयानीतानि पूजार्थ पुष्पाणिः प्रतिगृह्यताम् ।
ॐ महागणाधिपतये नमः पुष्पाणि समर्पयामि ।।

**अंगपूजा** (हातात अक्षतेची वाटी घेऊन देवाच्या अंगाचे ध्यान करत देवावर अक्षता वाहाव्यात)
ॐ गणेशाय नमः पदौ पूजयामि ।।
ॐ विघ्नराजाय नमः जानुनी पूजयामि ।।
ॐ आखुवाहनाय नमः अरु पूजयामि ।।
ॐ हेरम्बाय नमः कटिं पूजयामि ।।
ॐ कामारिसूनवे नमः नाभिं पूजयामि ।।
ॐ लम्बोदराय नमः उदरं पूजयामि ।।
ॐ गौरीसुताय नमः स्तनौ पूजयामि ।।
ॐ गणनायकाय नमः हृदयं पूजयामि ।।
ॐ स्थूलकष्ठाय नमः कंठं पूजयामि ।।
ॐ स्कंदाग्रजाय नमः स्कन्धौ पूजयामि ।।
ॐ पाशहस्ताय नमः हस्तौ पूजयामि ।।
ॐ विघ्नहर्त्रे नमः ललाटं पूजयामि ।।
ॐ सर्वेश्वराय नमः शिरं पूजयामि ।।
ॐ गणाधिपाय नमः सर्वांङ्ग पूजयामि ।।

**नानाविधपत्र समर्पणम्** (गणपतीला विविध पत्री वाहावी)
ॐ सुमुखाय नमः मालतीपत्रं समर्पयामि ।
ॐ गणाधिपाय नमः विल्वपत्रं समर्पयामि ।
ॐ गजाननाय नमः बदरीपत्रं समर्पयामि ।
ॐ लंबोदराय नमः दत्तूरपत्रं समर्पयामि ।
ॐ हरसुनवे नमः श्वेतदुर्वापत्रं समर्पयामि ।
ॐ गजकर्णाय नमः शम्मीपत्रं पत्रं समर्पयामि ।
ॐ गुहाग्रजाय नमः बृहतीपत्रं समर्पयामि ।
ॐ एकदन्ताय नमः करवीरपत्रं समर्पयामि ।
ॐ विकराय नमः अर्जुनपत्रं समर्पयामि ।
ॐ कपिलाय नमः विष्णूक्रांतपत्रं समर्पयामि ।
ॐ गजदन्ताय नमः दुर्वांकुरान् समर्पयामि ।
ॐ विघ्नराजाय नमः नानाविधपत्राणि समर्पयामि ।

**धूप** (महागणपतीला धूप ओवाळावा)
वनस्पतिरसोद्‌भूतो गंधाढ्यो गंधउत्तम ।
आद्रेयः सर्व देवानां धूपोयं प्रतिगृह्यताम्
ॐ महागणाधिपतये नमः धूपं आद्रापयामि ।।

**दीप** (महागणपतीला तूपाची नीरांजन ओवाळावी)
आज्यंचवर्ति संयुक्तं वघ्निना योजितं मया ।
दीपं गृहाण देवेश त्रैलोक्य तिमिरा पह ।
ॐ महागणाधिपतये नमः दीपं दर्शयामि ।।

**नैवेद्य** (देवाला २१ मोदकांचा किंवा गूळ खोबऱ्याचा, फळांचा नवैद्य दाखवावा)
शर्कराखंड खाद्यानि दधिक्षरघृतानिच ।
आहारं भक्षभोज्यंच नैवेद्यं प्रतिगृह्यताम् ।
(नैवेद्यावर दुर्वा ठेवाव्यात व देवाला नैवेद्य देतोय अशी मनामध्ये भावना ठेवावी)
ॐ प्राणाय स्वाहा । ॐ अपानाय स्वाहा ।
ॐ व्यानाय स्वाहा । ॐ उदानाय स्वाहा ।
ॐ समानाय स्वाहा । ॐ ब्रह्मणे नमः ।

ॐ महागणधिपतये नम: नैवेद्यं निवेदयामि ।
(एक पळी पारी ताह्मणात सोडावे)
नैवेद्यान्ते आचमनीयं समर्पयामि ।।

**ताम्बूल** (देवाला विडा अर्पण करावा)
पूगीफलं महत्‌दिव्यं नागवल्ली दलैर्युतम् ।
एलारिचूर्ण संयुक्तं ताम्बूलं प्रतिगृह्यताम् ।
ॐ महागणाधिपतये नम: ताम्बूलं समर्पयामि ।।
फलार्पणम् (देवाला फळे व श्रीफळ अर्पण करावे)
फलेन फलितं सर्व त्रैलोक्यं सचराचरम् ।
तस्मात्फलप्रानेन सफलाश्च मनोरथा: ।
ॐ महागणाधिपतये नम: फलं समर्पयामि ।।

**दक्षिणा (देवास दक्षिणा ठेवावी)**
हिरण्यं गर्भ गर्भस्थं हेमबीजं विभावसो: ।
अनंत पुष्य फलदं अत: शांतिं प्रयच्छमे ।
ॐ महागणाधिपतये नम: दक्षिणां समर्पयामि ।।

**आरार्तिक्य (देवाची आरती करावी)**
सुखकर्ता दु:खहर्ता ।..........
शेंदूर लाल चढायो ।............
कर्पुरगौरं करुणावतारं संसार सारं भुजगेन्द्रहारं।
सदा वसंतं हृदयारं विन्दे भवं भवानि सहितं नमामि।
ॐ महागणाधिपतये नम: अरार्तिक्यं समर्पयामि ।
(देवाला आरती देवून स्वत: आरती घ्यावी आणि हातावर पाणी घ्यावे)

**मंत्रपुष्पांजली (हातात फुले घेऊन मंत्रपुष्पांजली म्हणावी)**
ॐ यज्ञेन यम मयजन्तदेवा स्तानि धर्माणि
प्रथमान्यासन । तेहनाकम महिमान्: सचन्तयत्र पूर्वे
साध्या सन्ति देवा:।
ॐ एकदन्ताय विद्‌महे । वक्रतुंडाय धीमही।
तन्नो रुद्रे प्रचायोदयात ।।
(हातातील फुले महागणपतीस वाहावी)
ॐ महागणाधिपतये नम: पुष्पांजलीं समर्पयामि ।।

**प्रदक्षिणा (स्वत: भोवती प्रदक्षिणा घालावी)**
यानिकानिचपापानि जन्मान्तर कृतानिच ।
तानितानि विनश्यान्ति प्रदक्षिणं पदे पदे ।
ॐ महागणाधिपतये नम: प्रदक्षिणां समर्पयामि ।।

**विशेषार्थ (हातात नारळ घेऊन त्यावर पळीवर पाणी घालून एक गंध फूल ठेवावे व पुढील श्लोक म्हणावा)**
रक्ष रक्ष गणाध्यक्ष रक्ष त्रैलोक्य रक्षक
भक्तानाम् अभयंकर्ता त्राता भव भवार्णवात्
द्वैमातुर कृपासिंधो षाण्मातुरा ग्रजप्रभो ।
वरदत्वं वरं देही बांच्छितं वांच्छितार्थद् ।
(कपाळी लावून नारळ महागणपतीसमोर ठेवावा)
ॐ महागणाधिपतये नम: विशेषार्थ समर्पयामि ।

**प्रार्थना (महागणपतीची प्रार्थना करावी)**
विघ्नेश्वराय वरदाय सुरप्रियाय ।
लंबोदराय सकलाय जगद्धिताय ।
नागाननाय श्रुतियज्ञविभूषिताय ।
गौरीसुताय गणनाथ नमो नमस्ते ।।
(ॐ महागणाधिपतये नम: प्रार्थना पूर्वकं नमस्कारोमि।

**अर्पणम् (हातात पाणी घेऊन खालील संकल्प म्हणावा व पाणी ताह्मणात सोडून द्यावे)**
अनेक कृत पूजनेन महागणपति: प्रीयतां नमम् ।।
गणपती बाप्पा मोरया । मंगलमूर्ती मोरया ।।

**वरीलप्रमाणे महागणपतीची स्थापना केल्यानंतर रोज १० दिवस खालीलप्रमाणे पूजन सकाळ-संध्याकाळी करावे.**

**पंचोपचार पूजनम्**
ध्यानम् (महागणपतीचे स्मरणपूर्वक ध्यान करावे)
ॐ एकदन्ताय विद्‌महे । वक्रतुंडाय धीमही ।
तन्नो दन्ति: प्रचोदयात् ।
ॐ महागणाधिपतये नम: ध्यानामि ।।

**गंध (महागणपतीला गंध, अक्षत व हळद-कुंकू वाहावे)**
श्रीखंड चंदनं दिव्यं गंधाढ्यं सुमनोहरम् ।
विलेपनंच सुरश्रेष्ठं चंदनं प्रतिगृह्यताम् ।
ॐ महागणाधिपतये नम: चंदनं समर्पयामि ।।

**पुष्पं (महागणपतीला पुष्प व दुर्वा वाहाव्यात)**
माल्यादीनि सुगंधीनि माल्यादीनि वैप्रभो ।
मयानीतानि पूजार्थ पुष्पाणि: प्रतिगृह्यताम् ।
ॐ महागणाधिपतये नम: पुष्पाणि समर्पयामि ।।

**धूप (महागणपतीला धूप ओवाळावा)**
वनस्पतिरसोद्‌भूतो गंधाढ्यो गंधउत्तम ।
आद्रेय: सर्व देवानां धूपोयं प्रतिगृह्यताम्
ॐ महागणाधिपतये नम: धूपं आद्रापयामि ।।

**दीप: (महागणपतीला दीप ओवाळावा)**
आज्यंचवर्ति संयुक्तं वघ्निना योजितं मया ।
दीपं गृहाण देवेश त्रैलोक्य तिमिरा पह ।

ॐ महागणाधिपतये नमः दीपं दर्शयामि ।।

**नैवेद्य (महागणपतीला खिरापत किंवा गूळ खोबऱ्याचा नवैद्य दाखवावा)**

शर्कराखंड खाद्यानि दधिक्षीर घृतानिच ।
आहारं भक्षभोज्यंच नैवेद्यं प्रतिगृह्यताम् ।
ॐ प्राणाय स्वाहा । ॐ अपानाय स्वाहा ।
ॐ व्यानाय स्वाहा । ॐ उदानाय स्वाहा ।
ॐ समानाय स्वाहा । ॐ ब्रह्मणे नमः ।
ॐ महागणधिपतये नमः नैवेद्यं निवेदयामि ।

(यानंतर गणपतीची आरती करून मंत्रपुष्पांजली करावी. असे पूजन रोज सकाळ व संध्याकाली करावे)

**उत्तर पूजा**

श्री पार्थिव महागणपतीचे उत्तर पूजन म्हणजेच आपण १० दिवस मनोभावे गणपतीचे पूजन केले. त्याच गणपतीला आपण अनंत चतुर्दशीच्या दिवशी निरोप देत असतो. या दिवशी घरी पूजन करून नंतर विसर्जनाचे ठिकाणीही पंचोपचार पूजन करावे. आरती करावी व नंतर हातात अक्षता घेऊन मंत्र म्हणावा–

**विसर्जन :**

यान्तु देव गणाः सर्वे पूजामाराय पार्थिव । इष्ट काम प्रसिध्यर्थं मंगलानि पुनः पुनः ।।


वरील मंत्र म्हणून त्या अक्षता महागणपतीच्या मूर्तीवर वाहाव्यात आणि नंतर तीन वेळेला मूर्तीला पाण्यात मस्तकाभिषेक करून तिचे पाण्यात विसर्जन करावे.

**गणपति बाप्पा मोरया । पुढच्या वर्षी लवकर या ।।**

# अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेत ध्वजवंदन

**नाशिक :** अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था नाशिकच्या मुख्य कार्यालयात देशाच्या ७३ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त संस्थेचे कार्याध्यक्ष उदयकुमार मुंगी यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र गोवा बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड. अविनाश भिडे यांची बिनविरोध निवड झाली म्हणून संस्थेच्या वतीने त्यांचा शाल श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील पूरग्रस्तांना संस्थेच्या वतीने रुपये ३१०००/– चा धनादेश रा.स्व संघाच्या जनकल्याण समितीचे अनिल चांदवडकर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. नागनाथ गोरवाडकर, कार्यवाह अजित चिपळूणकर, कार्यकारिणी सदस्य सचिन पाडेकर, मिलिंद गांधी, सुभाष सबनीस, पांडुरंग सावजी, उल्हास पंचाक्षरी, तसेच ॲड. समीर जोशी, महेश शुक्ल, ॲड. सतीश बाल्टे, सतीश करजगीकर, प्रदीप भानुवंशे, अनिल नांदुर्डीकर, सुहासिनी बुरकुले, सौ. शरयू मुंगी सुहास कुलकर्णी, विजया म्हैसपुरकर आदी उपस्थित होते.

# हार्दिक अभिनंदन



### अविनाश भिडे

महाराष्ट्र आणि गोवा बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी बिनविरोध झाली आहे. यापूर्वीही त्यांनी हे पद भूषविलेले आहे.



### प्रा. डॉ. लक्ष्मीकांत भट

कॉमर्स मॅनेजमेंट या क्षेत्रात महाराष्ट्रातील नागरी बँकांचा विश्लेषणात्मक अभ्यास करून बँकिंग व फायनान्स या विषयात त्यांनी डॉक्टरेट ही पदवी मिळविली आहे. विशेष म्हणजे सेवानिवृत्तीनंतर त्यांनी हे यश मिळविले आहे.



### सौ. मोहिनी भगरे

बी.एड. परीक्षेत विशेष गुणवत्ता मिळवून त्या उत्तीर्ण झाल्या. नोकरी सांभाळून त्यांनी हे यश संपादन केले आहे.

# मागील वर्षात संस्था व केंद्रांच्या झालेल्या कार्यक्रमाचा गोषवारा

**पुणे केंद्र:**

१) दिनांक १७ एप्रिल २०१८ रोजी संस्थेच्या कार्यालयात महिलांसाठी चैत्रगौर हळदी-कुंकू कार्यक्रम घेण्यात आला. ६० ते ७० महिला उपस्थित होत्या.

२) दिनांक १० मे ते १५ मे या कालावधीत संस्थेच्या कार्यालयात शालेय विद्यार्थांसाठी भाषा विकास नाट्यवाचन, सूत्रसंचालन आदींसंदर्भात कार्यशाळा घेण्यात आली.

३) दिनांक २९ मे रोजी संस्थेच्या कार्यालयात सप्तशती पाठाचे आयोजन करण्यात आले होते.

४) दिनांक २४ जून २०१८ रोजी तळजाई येथील स्प्रिंगहिल सोसायटी व गोंदवलेकर महाराज मठ येथे वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला.

५) दिनांक २८ जुलै विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत वाटप रूपये ६०,०००/- देण्यात आली. आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले.

६) दिनांक ७ जुलै रोजी सकाळी ८.०० वा. गुप्ते मंगल कार्यालय येथे डॉ. रामचंद्र देखणे यांच्या दिंडीतील वारकऱ्यांना चहा-नाश्ता देण्यात आला. जवळजवळ ८० ते ९० वारकरी उपस्थित होते.

७) दिनांक २४ ऑगस्ट श्रीसुक्त पठाण करण्यात आले.

८) दिनांक १ सप्टेंबर रोजी संस्थेचा रक्षाबंधनाचा कार्यक्रम भूगाव येथील 'एचआईव्ही'बाधित मुलांसाठी संस्थेत करण्यात आला. मुलांना राखी बांधून नारळी बर्फी देण्यात आली.

९) दिनांक २२ सप्टेंबर रोजी मंडई गणपती आरती संस्थेच्या वतीने घेण्यात आली.

१०) दिनांक २४ ऑक्टोबर रोजी रहाळकर मंदिर येथे भोंडला कार्यक्रम घेण्यात आला. अंदाजे ६० महिला उपस्थित होत्या.

११) दिनांक २८ ऑक्टोबर रोजी कोजागिरी पोर्णिमा साजरी करण्यात आली. सौ. भट व सहकारी यांच्या गाण्यांच्या मैफिलीने रसिकांना मंत्रमुग्ध केले. गौरी सजावट स्पर्धेचा बक्षीस समारंभ करण्यात आला. अंदाजे ५५० रसिक या कार्यक्रमास उपस्थित होते. मसाला दुधाचे वाटप करण्यात आले.

१०) दिनांक ७ नोव्हेंबर रोजी संस्थेत श्री. व सौ. गोखले यांच्या हस्ते लक्ष्मीपूजन करण्यात आले.

११) दिनांक २४ डिसेंबर रोजी सायंकाळी श्री. व सौ. माणकिकर यांच्या हस्ते संस्थेमध्ये वर्धापन दिनानिमित्त सत्यनारायणाची महापूजा करण्यात आली. तीर्थ प्रसादासाठी ७० ते ८० सभासद येऊन गेले.

१२) दिनांक ८ जानेवारी रोजी सायं. ५.०० वाजता लोकमान्य सभागृह येथे वर्धापन दिन पुरस्कार सोहळा संपन्न झाला. श्री. ह.भ.प. चारुदत्त आफळे यांना कीर्तनभूषण हा पुरस्कार देण्यात आला. श्री. पियुष शहा यांना सामाजिक पुरस्कार देण्यात आला. ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल प्रेरणा पुरस्कार व नलिनी इनामदार यांना वात्सल्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याच कार्यक्रमात सावरकर निबंध स्पर्धेचा बक्षीस समारंभ घेण्यात आला. विजयी स्पर्धकांना पुस्तके देण्यात आली.

१३) चारुदत्त आफळे यांचे ग.दि.मा. व सुधीर फडके यांच्या जन्म शताब्दी निमित्त स्वरगाथा हे अत्यंत सुरेल रसाळ मंत्रमुग्ध करणारे कीर्तन सदर झाले.

१४) फेब्रुवारी महिन्यात तिळगूळ समारंभ संस्थेत साजरा करण्यात आला. सौ. रुपाली साळवे ही (नववधू) हिला संक्रांताचे वाण -हलव्याचे दागिने व साडी देण्यात आली. ५० ते ६० महिला उपस्थित होत्या.

१५) २६ फेब्रुवारी सावरकर पुण्यतिथीनिमित सर्व वयोगटासाठी निबंध स्पर्धा घेण्यात आल्या.

१६) ९ मार्च रोजी वेद्शास्त्रोतेजक सभागृह येथे महिला दिन साजरा करण्यात आला.

**जुन्नर केंद्र :**

१) दिनांक १० एप्रिल २०१८ मंगळवार रोजी प्रतिवार्षिक चैत्रगौरी हळदी कुंकू कार्यक्रम श्री.तांबडी जोगेश्वरी मंदिर येथे आयोजित केला होता.सर्व महिला भगिनींनी कार्यक्रमाचे उत्तम नियोजन करून यशस्वीरीत्या संपन्न

केला.

२) दिनांक १८ एप्रिल २०१८ बुधवार रोजी श्री.परशुराम जयंतीनिमित्त जनता सहकारी बँकेचे शाखा प्रमुख श्री. साठे साहेब यांचे शुभहस्ते प्रतिमा पूजन करून श्री. प्रफुल्ल कुलकर्णी यांनी श्री. पराशुरामाबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमात सर्व ज्ञाती बांधव बहुसंखेने उपस्थित होते व नंतर प्रसाद वाटप करून कार्यक्रमाचा समारोप झाला.

३) दिनांक २३ एप्रिल २०१८ सोमवार रोजी कु. रेवती देशपांडे यांच्या हृदय प्रत्यारोपन शस्त्रक्रियेसाठी सर्व बांधवांच्या वतीने आर्थिक मदत देण्यात आली. त्याचा स्वीकार तिच्या कुटुंबियांनी करून संस्थेस धन्यवाद दिले.

४) दिनांक १६ मे २०१८ बुधवार रोजी श्रीमद्‌भागवत साप्ताह व विष्णू याग विष्णू मंदिर देवस्थान व जुन्नर केंद्राच्या विद्यमाने आयोजित कार्यक्रमास रक्कम रु.१५.०००/- (रुपये १५ हजार) देऊन हातभार लावला.

५) दिनांक २३ जुलै २०१८ सोमवार रोजी आषाढी एकादशीनिमित्त ओतूर, (जुन्नर) येथील ब्राह्मण संघातर्फे विठ्ठल मंदिरात आयोजित कार्यक्रमात भाग घेतला.

६) दिनांक २८ ऑगस्ट २०१८ मंगळवार रोजी श्री. तांबडी जोगेश्वरी मंदिर येथे विद्यार्थी गुणगौरव समारंभ श्री. श्रीराम चंद्रात्रेय नाशिक यांचे शुभहस्ते व सर्व ज्ञाती बांधवांचे उपस्थितीत संपन्न करण्यात आला.

७) दिनांक १३ सप्टेंबर २०१८ ते २३ सप्टेंबर २०१८ पर्यंत होणाऱ्या गौरी गणपती कार्यक्रमात सर्व ज्ञाती बांधवांना शुभेच्छा देऊन श्री. चरणी सर्वांना सुख समृद्धीची प्रार्थना करण्यात आली.

८) दिनांक १० ऑक्टोंबर २०१८ ते १८ ऑक्टोंबर २०१८ पर्यंत श्री. तांबडी जोगेश्वरी मंदिरामध्ये संपन्न होणाऱ्या नवरात्र उत्सवात सक्रीय सहकार्य करून सहभाग घेतला.

९) दिनांक ०४ नोव्हेंबर २०१८ ते ०९ नोव्हेंबर २०१८ रोजी होणाऱ्या दीपावलीच्या सर्व ज्ञाती बंधावांना केंद्राच्या वतीने केंद्रप्रमुख श्री. रामचंद्र वैद्य यांनी शुभेच्छा दिल्या.

१०) दिनांक १५ डिसेंबर २०१८ ते २२ डिसेंबर २०१८ रोजी श्री. गुरुचरित्र दत्त यांची पारायण सोहळा श्री. तांबडी जोगेश्वरी मंदिर येथे संपन्न करण्यात आला.

११) दिनांक २७ जानेवारी २०१९ रोजी ब्राह्मण संघ राजगुरुनगर यांचे वतीने आयोजित वधू-वर मेळाव्यास उपस्थित राहून केंद्राच्या व मध्यवर्ती संस्थेच्या वतीने कार्यक्रमास श्री.चंद्रशेखर जोशी यांनी शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले.

१२) दिनांक ०६ फेब्रुवारी २०१९ बुधवार रोजी केंद्राचे वतीने तिळगुळ समारंभ व हळदी-कुंकू कार्यक्रम संपन्न करण्यात आला. श्री.भालवणकर यांनी मौलिक मार्गदर्शन केले व तिळगुळ वाटप होऊन अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

**पंचवटी केंद्र:**

१) राष्ट्रीय विकास मंडळ,नाशिक आयोजित मराठी नववर्ष स्वागत यात्रेत पंचवटी केंद्रातील सभासद सहकुटुंब सहपरिवार मोठ्या संखेने सहभागी झाले होते

२) परशुराम जयंतीच्या दिवशी पंचवटी केंद्राच्या वतीने मुली व महिलांचे लेझीम पथक तसेच ढोल पथक सहभागी झाले होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. उदयकुमार मुंगी केंद्राचे पालक श्री. उल्हास पंचाक्षरी यांचे मार्गदर्शन लाभले.

३) दीप अमावास्येच्या दिवशी पंचवटी केंद्रामार्फत कपालेश्वर मंदिर, पंचवटी नाशिक येथे दिवे लाऊन दीप अमावस्या साजरी करण्यात आली. यात कपालेश्वर मंदिरात सर्व भक्त गण व त्याच बरोबर पंचवटी तसेच नाशिक केंद्रातील सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

४) श्रावण महिन्यात येणारी मंगळागौरी बाबतची माहिती सर्व मुली महिलांना कळावी म्हणून मंगळागौरीचे खेळ व शुक्रवारचे हळदी कुंकू साजरे केले गेले.तसेच श्रावणात येणारी कृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने समाजातील सर्व जातीधर्माच्या मुलींना व महिलांना एकत्र आणून दहीहंडीचा उत्सव साजरा केला गेला. यासाठी सौ. सुचेता भानुवंशे, वृषाली घोलप, सौ. अश्विनी कुलकर्णी, सौ. मीनल कुलकर्णी, सौ. प्रज्ञा वणीकर व इतर महिलांनी विशेष प्रयत्न केले.

५) ५ वर्षांपासून पुढील मुला-मुलींसाठी शाडू मातीचे गणपती कार्यशाळा घेण्यात आली. सदर कार्यक्रमास जवळपास ५० पेक्षा जास्त जणांचा सहभाग नोंदविला

गेला. सदर कार्यक्रमास सौ. पद्मा गर्गे, सौ. वृषाली घोलप, सौ. मनीषा इनामदार, सौ. सुचिता देशमुख, श्री. संजय कुलकर्णी, श्री. निशिकांत पंचाक्षरी यांनी योगाचे सहकार्य केले.

६) नवरात्रात कुमारिका पूजन व भुलाबाई असा एकत्र कार्यक्रम पंचवटी केंद्रामार्फत घेण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. पद्मा गर्गे, सौ. वृषाली घोलप, सौ. मीनल कुलकर्णी इत्यादींनी प्रयत्न केले.

७) संक्रांतीच्या दिवशी तिळगूळ वाटप करण्यात आले तसेच महिला सभासदांनी आपापल्या घरी हळदी–कुंकू समारंभ साजरा केला.

८) पंचवटी केंद्राच्या वतीने महिलांचे सोशल मीडिया अवेरनेस यावा यासाठी सायबरतज्ज्ञ, पोलीस सब इस्पेक्टर कयानी वर्मा व कुमारी स्वरा यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यासाठी ५० पेक्षा जास्त महिला उपस्थित होत्या.

**निरा केंद्र:**

१) सर्व प्रथम केंद्रामार्फत श्री. भगवान परशुराम जयंतीचा कार्यक्रम श्री. नारायण कुलकर्णी यांच्या घरी सभासदांच्या उपस्थितीत करण्यात आला.

२) दिनांक १८ एप्रिल २०१८ रोजी श्री. संत ज्ञानेश्वर महाराज व श्री. संत सोपानकाका यांच्या पालख्या निरा गावात आणल्या. तेव्हा केंद्राच्या वतीने अन्नदान व बिस्किटे–चहा वाटप करण्यात आले.

३) श्रावण महिन्यात निरा येथील नदीच्या दत्तात्रय महाराजांचे घाटावर श्रावणीच्या कार्यक्रमास अनेक भाविकांनी गर्दी केली होती.

४) निरा केंद्राजवळ असलेल्या वाघालवाडी, करंजे, जेऊर, व मांडकी या गावातून समाजाच्या सदस्याकडून मासिक सभा ठेऊन विचारांच्या आदानप्रदान व नवीन सभासद यासाठी प्रयत्न केले. त्यात नवीन १२ सभासद झाले.

५) निरा केंद्राच्या आपल्या जवळील समाज बांधव एकत्र येण्यासाठी जेजुरी, मोरगाव, लोणंद, कोरेगाव व शिरवळ येथे नवीन केंद्र स्थापनेसाठी प्रयत्न चालू आहे. केंद्र स्थापनेसाठी श्री. संतोष केजले, श्री. मुकुंद बोकील व इतर सभासदांचे मोलाचे सहकार्य लाभले.

६) सालाबादप्रमाणे यंदाही दिनांक २६ फेब्रुवारी २०१९ रोजी स्वात्यंत्रवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम ग्रामपंचायतीच्या सभागृहात घेण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून मु.सा. काकडे कॉलेजचे प्राध्यापक श्री. सतीशराव गायकवाड सर, श्री. सोमप्रसाद केंजळे, डॉ. शिवदे उपस्थित होते.

७) जानेवारीपासून नवीन सभासद वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न केले गेले त्यात २२ सभासदांची वाढ झाली.

८) अनेक वर्षे होत नसलेला निरा केंद्राचा वर्धापन दिनांचा कार्यक्रम २६ जून २०१९ रोजी पार पडला.

**मध्यवर्ती संस्था**

१) बुधवार दिनांक १८ एप्रिल २०१८ रोजी परशुराम जयंती मोठ्या उत्सहात साजरी करण्यात आली.

२) सोमवार दिनांक २८ मे २०१८ रोजी संस्थेमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीचा कार्यक्रम घेण्यात आला. सावरकरांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून मानवंदना देण्यात आली. या वेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

३) बुधवार दिनांक १५ ऑगस्ट २०१८ रोजी प्रजासत्ताक दिन निमित्त संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. उदयकुमार मुंगी यांच्या हस्ते झेंडा वंदन करण्यात आले. यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

४) गुरुवार, दिनांक २० सप्टेंबर २०१८ रोजी गणेशोत्सव कार्यक्रमांतर्गत सहस्त्रावर्तनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

५) बुधवार दिनांक १७ ऑक्टोंबर २०१८ रोजी नवचंडी याग घेण्यात आला. यावेळी ११ जण सपत्नीक पूजेला बसले होती.

६) सोमवार दिनांक २४ डिसेंबर २०१८ रोजी संस्थेचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी परमपूज्य सुभाषगिरी महाराज दत्त देवस्थान, करंजी यांना धर्मिक परंपरा, श्री माधव दत्तात्रय बर्वे यांना शेतीतज्ज्ञ, श्री. सचिन उषा विलास जोशी यांना शिक्षण पुरस्कार, सौ. अपूर्वा जाखडी स्पेस एजुकेटर नासा यांना अंतराळ संशोधन, श्री. विनायक जाधव महाराज यवतमाळ यांना सामाजिक पुरस्कार सन्मानपत्र व रोख रुपये पाच हजार देवून गौरवण्यात आले.

७) मंगळवार दिनांक २२ जानेवारी २०१९ रोजी मुंबई येथे ब्राह्मण समाजाला आरक्षण मिळावे यासाठी धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी संस्थेतर्फे अंदाजे


१०० लोक मुंबईला गेले होते.

८) शनिवार दिनांक २६ जानेवारी २०१९ रोजी संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. उदयकुमार मुंगी यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

९) मंगळवार दिनांक १९ फेब्रुवारी २०१९ रोजी पुलवामा येथे झालेल्या भ्याड हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना समाजातील सर्व स्तरातील लोकांनी एकत्र येऊन भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

## निमाच्या उपाध्यक्षपदी श्रीपाद कुलकर्णी

**नाशिक :** बीबीएनजीचे संस्थापक व उद्योजक श्रीपाद



कुलकर्णी यांची निमा या नाशिकच्या उद्योजकांच्या शिखर संस्थेच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. काही घटकांचा विरोध असतानाही आपल्या ज्ञातीच्या श्रीपाद कुलकर्णी यांना मिळालेले हे यश भूषणावह असेच आहे. उद्योग क्षेत्रात, ब्राह्मण समाजासाठीचे योगदान, वारकरी संप्रदायासाठीचे योगदान एकूणच समाजविषयी असलेली आत्मियता हे त्यांचे यशाचे गमक आहे. श्रीपाद कुलकर्णी यांना मिळालेल्या यशाबद्दल अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या वतीने त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन. त्यांच्या या यशाबद्दल मुकुंद कुलकर्णी, उदयकुमार मुंगी, अजित चिपळूणकर, ॲड. अविनाश भिडे, ॲड. नागनाथ गोरवाडकर यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## खरे, पटवर्धन, धालेवाडीकर यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**पुणे :** दि. २ ऑगस्ट रोजी सायंकाळी रहाळकर राम मंदिर विष्णूप्रसाद हॉल सदाशिव पेठ येथे झाला अध्यक्ष माजी महापौर श्री डॉ.सतिश देसाई अध्यक्ष,प्रमुख पाहुण्या श्रीमती कल्पनाताई धालेवाडीकर होत्या. सौ. वरदा पटवर्धन, सौ. धनश्री खरे व मा.स. गोळवरकर गुरुजी विद्यालय डी.इ.एस. मुख्याध्यापिका श्री. कल्पनाताई धालेवाडीकर यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले. शैक्षणिक मदत, शैक्षणिक दत्तक योजना २० गरजू विद्यार्थ्यांना अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

## माधवराव भणगे यांचे निधन

**नाशिक :** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, जिल्हा



सरकारी कर्मचारी संघटनेचे नेते माधवराव भणगे (वय ८२) यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.


### जाहिरात दरपत्रक

| प्रकार | आकार | दरमहा | वार्षिक |
|---|---|---|---|
| रंगीत | पूर्णपान १९x२५ सेमी | ५०००.०० | ५००००.०० |
| | अर्धपान १९x१२ सेमी | २५००.०० | २५०००.०० |
| | पावपान ९x१४ सेमी | १५००.०० | १५०००.०० |
| कृष्णधवल | पूर्णपान १९x२५ सेमी | २५००.०० | २५०००.०० |
| | अर्धपान १९x१२ सेमी | १५००.०० | १५०००.०० |
| | पावपान ९x१४ सेमी | १०००.०० | १००००.०० |
| शुभेच्छा | पावपान १९x२ सेमी | ५००.०० (कृष्णधवल) | |

### सूचना

जाहिरातीचे आर्टवर्क 'सीडीआर' किंवा 'पीडीएफ' फॉर्मेटमध्ये संस्थेचा मेल आयडी sanmargmitra2018 @gmail.com वर पाठविणे किंवा समक्ष संस्थेच्या कार्यालयात आणून देणे.

# पूजन ज्येष्ठा-कनिष्ठाचे

भाद्रपद शुद्ध पक्षात अनुराधा नक्षत्रावर आवाहित केल्या जाणाऱ्या देवतेस ज्येष्ठागौरी असे संबोधले जाते. या देवतेचे आवाहन अनुराधा नक्षत्रावर आणि पूजन ज्येष्ठा नक्षत्रावर तसेच विसर्जन मूळ नक्षत्रावर होते. पुराणात थोडेफार उल्लेख आणि मौखिक परंपरेने चालत आलेली कहाणी इतकीच माहिती ज्येष्ठागौरीविषयी उपलब्ध आहे. जेष्ठा नक्षत्रावर ही देवी येत असल्याचे तिला जेष्ठागौरी म्हटले जाते. तसेच लक्ष्मीची जेष्ठा भगिनी अलक्ष्मी हिची पूजा या दिवशी केली जाते. जगात सर्वत्र प्रत्येक गोष्टींना चांगली– वाईट, डावी–उजवी अशा दोन विरोधी बाजू असतात. त्यातल्या डाव्या गोष्टीचा त्याग केल्यास अनवस्था निर्माण होते असे मानतात. वेद वाङ्मयातसुद्धा 'नमो जेष्ठाच च कनिष्ठाय च' 'स्तेतानां पतये नमः' अशी वचने आहेत. यावरून अनिष्ट गोष्टीबद्दल सुद्धा पूज्यभाव मनात बाळगणे, हे मानवाच्या आध्यात्मिक उन्नतीचे द्योतक असल्याचे दिसते.याप्रमाणे लक्ष्मीची थोरली बहिण 'अलक्ष्मी' ही देखील पूजनीय आहे. या संदर्भातील प्राचीन आरण्यका अशी आहे. समुद्र मंथनातून अनेक रत्नांबरोबर लक्ष्मी हे रत्न निघाले. साक्षात विष्णूने लक्ष्मीचा पत्नी म्हणून स्वीकार करण्याचा निश्चय केला. त्यावेळी आपल्या जेष्ठा भगिनीचा विवाह झाल्याशिवाय आपण विवाह करणार नाही, असे लक्ष्मीने सांगितल्यावर विष्णूने तिचा विवाह एका तपस्वीशी लावून दिला. पण अलक्ष्मीचे उपद्रवी अवगुणामुळे तो तपस्वी वनात पळून गेला. तेव्हा अलक्ष्मी अश्वत्थवृक्षा खाली रडत बसली.एकदा विष्णू तिथून जात असता त्यांनी तिला रडताना पाहिले. तिची हकिकत ऐकून त्यांनी तिचे सांत्वन केले व तिला तीन वरही दिले. पहिला वर, जिथे भक्तीचा अभाव, आळस, व्यसनाधीनता, नास्तिकता, अधर्म असेल तिथे तिने वास्तव्य करावे. दुसरा वर, शनिवारी अश्वत्थास प्रदक्षिणा घालणाऱ्यास तिने पिडा देऊ नये. तिसरा वर, दरवर्षी भाद्रपद महिन्यात जेष्ठा नक्षत्रावर तिची पूजा केली जाईल, असा होता. तेव्हापासून जेष्ठा गौरीपूजनाच्या दिवशी लक्ष्मी व अलक्ष्मी या दोघी बहिणींची पूजा केली जाते. ही गौर वाहत्या पाण्यातून आणण्याची प्रथा आहे. तिचे विसर्जनही वाहत्या पाण्यातच केले जाते. कारण अलक्ष्मी ही जलदेवता असल्याने तिचे वास्तव्य वाहत्या पाण्यात असते.या दोन गौरीमधील एक गौर म्हणजे लक्ष्मी घरातच असते. दुसरी बाहेरून आणतात तीच जेष्ठा गौर घरात आणताना तिचाही उल्लेख लक्ष्मी असाच केला जातो. यावेळी जमिनीवर रांगोळीने आठ पावले काढली जातात. प्रत्येक पावलावर थोडे थांबून लक्ष्मीच्या विविध रूपांचा उल्लेख केला जातो. यामध्ये अष्टलक्ष्मी चा समावेश असतो. गौरीचे आवाहन करण्याच्या अनेक पद्धती निरनिराळ्या प्रांतांनुसार प्रचलित आहेत. काही घरात चांदीच्या किंवा पितळ्याच्या किंवा मातीच्या मुखवट्यावर तर काही जणी सुघट (संक्रांत, घट, मातीचे भांडे), काही घरात वाहत्या पाण्याजवळच्या खड्यांवर तर काही जणी मूर्तीवर गौरीचे आवाहन करतात. काही प्रांतात गौरी म्हणजेच शंकराची पत्नी मानून पूजा करण्यात येते. जेष्ठा गौरी म्हणजे माहेरी आलेली माहेरवाशीणच. या दिवशी सासूरवाशिणींना आपल्या माहेरी विशेष मान असतो. गौरी दिवशी घरी विशिष्ट प्रकारचे अन्न शिजवण्याची प्रथा आहे. त्यात प्रामुख्याने भाजी–भाकरीचा, ज्वारीच्या कण्याचा समावेश होतो. संध्याकाळी हळदीकुंकवाचा कार्यक्रम करून रात्री झिम्माफुगड्या, घागरी फुंकणे असे खेळ खेळून जागरण केले जाते. अष्टमीच्या दिवशी गौरीपूजन करून पुरणाचा नैवेद्य दाखविला जातो. जेष्ठा गौरी हे पार्वतीचेच विशिष्ट रूप मानले जाते. तिला वैराग्यलक्ष्मीच म्हणतात. लक्ष्मी प्राप्तीनंतर जो मद मस्त, जो अहंकार जोपासला जातो त्या सर्वांवरील उतारा म्हणजे 'जेष्ठा गौरी व्रत' असे मानतात. जेष्ठा गौरीचे विसर्जन मूळ नक्षत्रावर होणे आवश्यक आहे. कारण कोणत्याही गोष्टीचा त्याग मूळ नक्षत्रावर केल्यास त्या गोष्टी पुन्हा वाढीस लागत नाहीत, असे मानतात. विसर्जनाच्यावेळी दहीभाताचा नैवेद्य दाखवून या देवतेवर अक्षता वाहून तिला निरोप देतात.

**(सौजन्य : अंतरजाल)**

**अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था**

**आणि**

**समाज सहायक संस्था, नाशिक**

# गणेशोत्सवानिमित्त आयोजित

# सामूदायिक अथर्वशीर्ष पठण-२०१९

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिकच्या वतीने दरवर्षी गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. यावर्षीही गणेशोत्सवानिमित्त सामुदायिक अथर्वशीर्ष पठणाचा भव्य कार्यक्रम रविवार, दि. ०८ सप्टेंबर २०१९ रोजी सायंकाळी ५.०० वाजता आयोजित करण्यात आलेला आहे. शहरातील सर्व समाज बांधवांना आवाहन करण्यात येते की, या सामुदायिक अथर्वशीर्ष पठणासाठी उपस्थित राहावे. नाशिक शहरातील सर्वशाखीय ब्राह्मण संस्था व समाज बांधवांनी याकरिता एकत्रित येवून हा उपक्रम यशस्वी करावा. हा कार्यक्रम सर्व जाती-धर्मांसाठी खुला आहे.

**कार्यक्रमाची रूपरेषा :-**

नावनोंदणी शुक्रवार, दि. १ सप्टेंबर २०१९ सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत संस्था कार्यालयात करावी.
रविवार, दि. ०८ सप्टेंबर २०१९ रोजी ठीक ४:३० वाजता आपल्या जागेवर स्थानापन्न व्हावे.
ठीक ५:०० वाजता सामुदायिक पठणाला सुरुवात होईल.
ठीक ६:०० वाजता महाआरती सुरू होईल.
ठीक ६:३० वाजता प्रसाद.

**श्री. अजित चिपळूणकर** — **कार्यवाह**
**श्री. उदयकुमार मुंगी** — **कार्याध्यक्ष**
**ॲड. श्री. गणेश गोखले** — **अध्यक्ष**

**सर्व कार्यकारिणी सदस्य, अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक**

**सर्व पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य, नाशिक केंद्र**

**रविवार, दि. ०८ सप्टेंबर २०१९, वेळ सायंकाळी ५.०० वाजता**

**स्थळ : अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था कार्यालय, जलशुद्धीकरण केंद्राशेजारी, सिबल हॉटेलजवळ, त्र्यंबकरोड, नाशिक ४२२००२.**

# विघ्नहर्ता वधु-वर सहायक मंडळ



संस्थेच्या वतीने सर्वसमावेशक अशी विघ्नहर्ता विवाह मंडळ या नावाने एक अतिशय उत्कुष्ट अशी वेबसाईट तयार करण्यात आली आहे. या वेबसाईटच्या सहाय्याने कोणत्याही जाती–धर्माचे लोक अनुरूप असे वधु–वर संशोधन करू शकतील. या वेबसाईटचे वैशिष्ट्य असे आहे की, आपण अगदी मोबाईलवरसुद्धा या वेबसाईटचा वापर करू शकता. या वेबसाईटवर आपले नाव नोंदणी करण्यासाठी आवश्यक असणारी फीसुद्धा आपण मोबाईलच्या माध्यमातून भरू शकता. अशा सर्व सोयीनी युक्त अशा मराठी व इंग्रजी भाषेची सोय असलेली ही वेबसाईट प्रत्येकासाठी उपयोगी ठरणार आहे. ज्यांची नोंदणी करावयाची असेल त्याचे **आधारकार्ड** या ठिकाणी आपणास पाहावयास मिळेल. म्हणजेच या वेबसाईटवर नोंदणी झालेल्या इच्छुकांची माहिती आपल्याला तपासून पाहाणे सोयीचे होईल. अशी सोय असलेली ही पहिलीच वेबसाईट असावी. सर्व सभासद तसेच सर्व जाती–धर्माच्या नागरिकांना आवाहन करण्यात येते की, प्रत्येकाने या वेबसाईटला भेट द्यावी व आपल्याला आवश्यक ती माहिती भरून वधु–वर संशोधन करावे ही नम्र विनंती.

वेबसाईट www.abms.vignhartamatrimoni.com

या वेबसाईटला भेट दिल्यानंतर आपल्याला ही वेबसाईट वापरण्यास किती सोपी व स्वस्त आहे ते समजेल.
प्रत्येकाने एकवेळ या वेबसाईटला अवश्य भेट द्यावी ही विनंती.

***अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था व समाज सहाय्यक संस्था, नाशिक संचलित***

**विघ्नहर्ता वधु–वर सहाय्यक मंडळ :** vighnahartamatrimony.com

ही वेबसाईट सर्व जाती–धर्मियांच्या वधु–वरांकरिता सुरू करण्यात आली असून इच्छुकांनी याचा लाभ घ्यावा,
असे आवाहन संस्थेमार्फत करण्यात येत आहे.

## ऑफलाईन नाव नोंदणीसाठी संपर्क

नाशिक : ०२५३–२३१३५९९

नाशिक (पंचवटी) : ७९७२२४२१६५

पुणे : ०२०–२४४३६९२२

जुन्नर : ९९७५६०३७७६

फलटण : ९८६०७२८६९८/९४२१८८१५६३

निरा (पुरंदर) : ९८२३३२६६८४

## वेबसाईटवर नोंदणी फक्त ऑनलाईनच करता येणार असून त्याचे दर खालीलप्रमाणे

**३ महिन्यांकरिता : १०००/–**

**६ महिन्यांकरिता : २०००/–**

**१ वर्षासाठी : ३०००/–**

**१ वर्षानंतर नूतनीकरणास : १०००/–**






# अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या सभागृहासाठी जनरेटरची व्यवस्था

**नाशिक :** अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या सभागृहात अनेक कार्यक्रम वर्षभर अविरत सुरू असतात. या कार्यक्रमाच्या वेळेस वीजप्रवाह अनेक वेळा खंडित होत असल्याने नागरिकांची गैरसोय निर्माण होते. अशी होणारी गैरसोय टाळण्यासाठी संस्थेतर्फे किर्लोस्कर कंपनीचे जनरेटर बसविण्यात आले आहे. नुकतेच त्याचे विधिवत पूजन करून सुरू करण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष गणेश गोखले, कार्याध्यक्ष उदयकुमार मुंगी, सहकार्यवाह गंगाधर कुलकर्णी, पांडुरंग सावजी, उल्हास पंचाक्षरी, ॲड. सतीश बाल्टे, सतीश करजगीकर, अनिल नांदुर्डीकर, चंद्रशेखर गायधनी, अजय आगाशे, प्रदीप भानुवंशे, सौ. गोखले, गायत्री चित्रगीमठ, जयश्री कुलकर्णी, सुहासिनी बुरकुले, विजया म्हैसपुरकर आदी उपस्थित होते.

---

## अद्वैत आगाशे यास शिष्यवृत्ती


**नाशिक :** अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या अभ्यंकर सभागृहाचे कॉन्ट्रॅक्टर श्री. अजय आगाशे यांचे चिरंजीव अद्वैत आगाशे हा १२ वी परीक्षेत ९४ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाला. त्यास आयआयटी, गोवा येथे प्रवेश मिळाला असून त्याला मिळालेल्या गुणांच्या जोरावर धिरूभाई अंबानी ट्रस्टची शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. त्याचे अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेतर्फे मन:पूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा!



## वाढदिवस...

**सतीश करजगीकर**
**१ ऑगस्ट २०१९**
**विनोद कुलकर्णी**
**२६ ऑगस्ट २०१९**
**सुवर्णा बाल्टे**
**२८ ऑगस्ट २०१९**
**विजया म्हैसपूरकर**
**२३ नोव्हेंबर २०१९**

## ‘सन्मार्ग मित्र’ लेखन पाठविण्याकरिता सूचना



१. राजकिय विषय सोडून कोणत्याही प्रकारचे लिखाण पाठवावे.
२. लिखाण कागदाच्या एका बाजूस सुवाच्च अक्षरात लिहिलेले अथवा टाईप केलेले असावे.
३. ब्राह्मण समाजातील विविध संस्था कार्यरत आहेत. त्यांनी आपआपल्या संस्थांच्या कार्यक्रमाचे वृत्तांत मुद्देसुद पाठविल्यास त्या लिखाणाला प्राधान्य देण्यात येईल.
४. प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेपर्यंयत लिखाण संस्थेच्या कार्यालयात पोहोचेल या बेताने ते पाठवावे.
५. मासिकाच्या ध्येय धोरणाला अनुसरुन लिखाणामध्ये आवश्यक तो बदल करण्याचा अधिकार संपादकांनी राखून ठेवला आहे.
६. लिखाण स्वीकृत अगर अस्वीकृत करणे संपादकांच्या अधिकारात राहिल. अग्राह्य लिखाणास कारण देण्याचे बंधन संपादकांवर नाही. तसेच लिखाणास कोणतेही मानधन दिले जाणार नाही.
७. मासिकात व्यक्त होणाऱ्या मतांशी संस्था किंवा संपादक सहमत असतीलच असे नाही.

## विनम्र आवाहन

१. संस्थेच्या सर्व सभासदांनी आपला बदललेला अथवा नवीन पत्ता, फोन नंबर, मेल आयडी इत्यादी संस्था कार्यालयात येऊन अथवा पत्राद्वारे अपडेट करावा ही विनंती.
२. ब्राह्मण समाजातील सर्व जाती, पोट जातीच्या समाजबांधवांनी अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेचे सभासद व्हावे ही नम्र विनंती. (आजीव सभासद वर्गणी रु. ५०१/- मात्र) सभासदत्वाचा अर्ज संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध असून आपले ओळखपत्र, निवासाचा पत्ता व एक फोटोसह विहीत नमुन्यातील अर्ज कार्यालयात भरून द्यावा.

## संस्थेची केंद्र कार्यालये

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक केंद्र
केंद्र प्रमुख : श्री. महेश शुक्ल, मो. : ९८८११२४१४४
जलशुद्धीकरण केंद्राशेजारी, हॉटेल सिबल जवळ, त्र्यंबकरोड, नाशिक - ४२२ ००२. फोन : २५७२३२६

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, पंचवटी, नाशिक
केंद्र प्रमुख : श्री. प्रदिप भानुवंशे मो. : ७९७२२४२१६५
घर नं. ४४७७, भानुवंशे वाडा, भोंडे गल्ली, कपालेश्वर मंदिरामागे, पंचवटी, नाशिक - ४२२ ००३

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, पुणे केंद्र
प्रभारी केंद्र प्रमुख : ॲड. गणेश गोखले
‘कौशिक’, १२९३, सदाशिव पेठ, पुणे -३०.
फो : ०२०-२४४३६९२२

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, जुन्नर केंद्र
केंद्र प्रमुख : श्री. रामचंद्र वैद्य
मो. : ९९७५६०३७७६
बेलवलकर सभागृह, बुधवार पेठ, जुन्नर, जि. पुणे

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नीरा केंद्र
केंद्र प्रमुख : श्री. दत्तात्रय त्रिंबक बडबडे. मो. : ९८२३३२६६८४
समर्थ बंगला, बाजार तळ, मराठी शाळे मागे, नीरा, ता. पुरंदर जि. पुणे

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, फलटण केंद्र
केंद्र प्रमुख : श्री. भालचंद्र दत्तात्रय ताथवडकर.
मो. : ९८६०७२८६९८.
११८, कसबा पेठ, फलटण, जि. सातारा

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, शिरवळ केंद्र
केंद्र प्रमुख : ॲड. अमृत बाळकृष्ण मोने. मो. : ९८६०५ ४०९८६ । शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा.